# मेट्रो ३ : वायू व्हिजनसाठी चीनमधील कंपनीची निवड

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गातील आरे डेपो ते बीकेसी दरम्यानच्या स्थानकांसाठी वायू व्हिजन (टनेल व्हेंटिलेशन) आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली उभारण्यासाठी चीनमधील शांघाई टनेल इंजिनीअरिंगची निवड करण्यात आली आहे. एमएमआरसीएलच्या टप्पा १ अंतर्गत आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शन तत्त्वानुसारच ही निवड करण्यात आली आहे.

संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यान भुयारातील वायुविजन नियंत्रण प्रणाली अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे शांघाई टनेल इंजिनीअरिंग लिमिटेड समूहाच्या अनुभवामुळेच आरे डेपो ते बीकेसी मेट्रो स्थानकांदरम्यानच्या व्हेंटिलेशनसाठी निवड करण्यात आली आहे. या संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग असे कामाचे स्वरूप असणार आहे.

वायुव्हिजन यंत्रणेमुळे आपत्कालीन प्रवाशांना आग आणि धूर यांसारख्या समस्येपासून अधिक संरक्षण करणे शक्य होणार आहे. भविष्यात मेट्रो स्थानकांमध्ये रहदारी वाढली तरीही स्थानकांमध्ये योग्य ते तापमान आणि हवा राखून ठेवण्याची क्षमता या यंत्रणेमध्ये असणार आहे. याबाबत एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी भविष्यात मुंबई मेट्रो ३ च्या स्थानकांमध्ये वायुविजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीमुळे प्रवाशांच्या सेवेसाठी आरामदायी आणि सुरक्षित प्रवास करणे शक्य होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. मेट्रो ३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी तांत्रिक दृष्ट्या अद्यावत वायुविजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीची उभारणी करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले आहे.